ePaper 'इंडिया' आघाडी हिंदू धर्मविरोधी, राम मंदिरावरून भाजपचा आक्रमक प्रचार



| वर्ष - 7 | अंक - 243 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- भारताचा शानदार विजय
- हृतिकच्या वाढदिवशी 'फायटर'
- पंजाब-यूपी-राजस्थानात थंडीचा इशारा
- उरलेलं दुकान देखील बंद होईल

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 12 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## देशपातळीवर 446 शहरांच्या सर्वेक्षणात

# पिंपरी-चिंचवडची 'स्वच्छ' भरारी!

### शहराचा देशात 13 वा तर राज्यात तिसरा क्रमांक पटकावला

। पिंपरी । महाईन्यूज । ।

**सर्वोच्च शहर स्वच्छतेसाठी गेल्या वर्षभरापासून राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणात पिंपरी-चिंचवड शहराने फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेतली आहे. गेल्या दोन वर्षांपासून शहराचा १९ वा क्रमांक असताना यावर्षी देशात १३ वा तर राज्यात तिसरा क्रमांक मिळाला आहे.**



केंद्रीय विकास नागरी मंत्री हरदिपसिंह पुरी यांच्या हस्ते आज दिल्लीत पुरस्कार सोहळ्याचे वितरण झाले. महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी आरोग्य विभागाचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, प्रभारी कार्यकारी अभियंता हरविंदर बन्सल आदी उपस्थित होते. केंद्र सरकारच्या वतीने देशात २०१६ मध्ये स्वच्छ सर्वेक्षण अभियान राबविण्यास सुरूवात केली. पहिल्याच वर्षी शहराचा स्वच्छतेमध्ये नववा क्रमांक आला. त्यानंतर शहर स्वच्छतेमध्ये सातत्याने पिछाडीवर गेले होते. महापालिकेतर्फे विविध पातळ्यांवर जनजागृती आणि उपक्रम सुरू करुन स्वच्छागृह, सार्वजनिक स्वच्छतागृह महिलांना चालविण्यासाठी दिले. ओला, सुका कचरा वर्गीकरणावर भर दिला. जनजागृती केली. शहराच्या विविध भागात प्लॅगेथॉन मोहिम राबवून कचरा उचलला. सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर कारवाईसाठी ग्रीन मार्शल पथकाची नेमणूक केली.

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत देश पातळीवर शहरांच्या स्वच्छतेबाबतचे परीक्षण करण्यात आले. सेवा स्तर गुणांक, नागरिकांचा प्रतिसाद आणि कचरा मुक्त, हागणदारी मुक्त शहर या घटकांवरती केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत परीक्षण करण्यात आले.

> शहराला प्रथमच कचरा मुक्त शहरात पंचतारांकित मानांकन आणि हागणदारी मुक्त शहराचे सर्वोच्च वॉटर प्लसचा पुरस्कार मिळाला आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणात क्रमवारी सुधारावी, यासाठी गेल्या वर्षभरापासून आरोग्य विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. याला लोकप्रतिनिधी,सामाजिक कार्यकर्ते तसेच शहरवासीयांनी मोठे सहकार्य केले आहे. त्यामुळेच स्वच्छ सर्वेक्षणात पिंपरी-चिंचवड अव्वलस्थानी आले आहे.
>
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक.

> स्वच्छ सर्वेक्षणातील यश हे शहरवासीयांसह आरोग्य, पर्यावरण विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, विशेष करून सफाई कर्मचा-यांचे आहे. आगामी काळात शहर कसे स्वच्छ राहील, याकडे विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.
>
> **-यशवंत डांगे,** सहाय्यक आयुक्त, आरोग्य..

स्वच्छ सर्वेक्षणात सन २०१६ मध्ये शहराचा देशात नववा क्रमांक आला होता. २०१७ मध्ये शहराचा ७२ व्या क्रमांक आला होता. २०१८ मध्ये ४३ वा क्रमांक, २०१९ मध्ये ५२ वा क्रमांक, २०20 मध्ये २४ वा क्रमांक, २०२१ मध्ये १९ वा क्रमांक, २०२२ मध्येही १९ वा क्रमांक कायम होता. २०२३ मध्ये शहर स्वच्छतेमध्ये देशात १३ वे तर राज्यात तिस-या क्रमांकावर आले आहे.

## राम मंदिर राष्ट्रार्पण दिनी शासकीय सुट्टी द्या!

### आमदार महेश लांडगे यांची मागणी: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज ।

**दोन प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर राष्ट्रार्पण व श्रींची प्राणप्रतिष्ठा दि.२२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. हा दिवस भारतीय साठी गौरवाचा आणि उत्सवाचा आहे. महाराष्ट्रामध्ये शासकीय सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी भजपाचे प्रखर हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, तमाम भारतीयांचे श्रद्धास्थान प्रभू श्रीराम यांचे जन्मभूमी अयोध्या येथे मंदिरात आगमन व प्राणप्रतिष्ठा लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होत असून, हा भारतीयांसाठी मोठा आनंदोत्सव व ऐतिहासिक दिवस ठरणार आहे. नागरिकांची जनभावना लक्षात घेऊन राज्य शासनाने २२ जानेवारी रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी आणि हा दिवस सण-उत्सवाचा दिवस म्हणून घोषित करावा. हिंदू धर्म...संस्कृती आणि अखंड भारताच्या अस्मितेचे प्रतिक प्रभू श्रीराम मंदिरासाठी ५०० वर्षांपासून भारतीयांना प्रतिक्षा करावी लागली. पिढ्यांन-पिढ्यांनी पाहिलेले स्वप्न आता सत्यात उतरले आहे.

> प्रभू श्रीराम हे हिंदुत्वाचे, हिंदु अस्मिता आणि पुरुषत्वाचे प्रतीक आहेत. श्रीरामावर श्रद्धा असणारे कोट्यवधी भारतीय २२ जानेवारी २०२४ रोजी दिवाळी साजरी करणार आहेत. या सोहळ्याची देशभरात जय्यत तयारी झाली आहे. मंगलमय आणि पवित्र अशा वातावरणामध्ये उत्सव साजरा करता यावा. याकरिता शासकीय सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जावा, अशी अपेक्षा आहे.
>
> **-महेश किसनराव लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

# साखर कारखाने अडचणीत!

## क्रॉम्प्रेस्ड बायोगॅस' निर्मिती करण्याचा पवारांचा सल्ला

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादल्यामुळे देशभरातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. बी-हेवी मोलॅसिसच्या विक्रीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अडचणीच्या परिस्थितीत साखर कारखान्यांनी कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मिती करावी, असा सल्लाा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे (व्हीएसआय) अध्यक्ष आणि माजी कृषिमंत्री शरद पवार यांनी दिला.**





व्हीएसआयची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपाध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, विश्वस्त विजयसिंह मोहिते-पाटील, हर्षवर्धन पाटील, जयंत पाटील, दिलीप देशमुख, विशाल पाटील, पी. आर. पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, वेस्ट इंडियन शुगर मिल्सचे (विस्मा) अध्यक्ष बी. बी. ठोंबरे आदी उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, की केंद्र सरकारने सात डिसेंबर २०२३ रोजी उसाचा रस आणि पाकापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर निर्बंध लादले आहेत. साखरेचा पाक आणि बी-हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करताना १७ लाख टन साखरेची मर्यादा घातली आहे. त्यामुळे आसवणी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू नाहीत. बहुतेक कारखान्यांकडे १५ डिसेंबर २०२३ पर्यंत बी-हेवी मोलॅसिसचा साठा पडून आहे, त्याची विक्री किंवा वापर कसा करायाचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादल्यामुळे देशभरातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. बी-हेवी मोलॅसिसच्या विक्रीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अडचणीच्या परिस्थितीत साखर कारखान्यांनी कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मिती करावी, असा सल्लाा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे (व्हीएसआय) अध्यक्ष आणि माजी कृषिमंत्री शरद पवार यांनी दिला. केंद्र सरकारने २०२३ मध्ये सीएनजी आणि पीएनजीमध्ये कॉम्प्रेस्ड बायोगॅसचे (सीबीजी) मिश्रण करणे बंधनकारक केले आहे. २०२८-२९पर्यंत सीबीजीचे मिश्रण पाच टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. साखर कारखाने प्रेस मड आणि स्पेंट वॉशपासून सीबीजी तयार करू शकतात. देशाची सीबीजी उत्पादन करण्याची क्षमता २० लाख टन आहे.

त्यामुळे साखर कारखान्यांनी सीबीजी उत्पादन सुरू करावे, असे आवाहनही शरद पवार यांनी केले.केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादल्यामुळे देशभरातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. बी-हेवी मोलॅसिसच्या विक्रीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अडचणीच्या परिस्थितीत साखर कारखान्यांनी कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मिती करावी, असा सल्लाा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे (व्हीएसआय) अध्यक्ष आणि माजी कृषिमंत्री शरद पवार यांनी दिला. केंद्र सरकारने २०२३ मध्ये सीएनजी आणि पीएनजीमध्ये कॉम्प्रेस्ड बायोगॅसचे (सीबीजी) मिश्रण करणे बंधनकारक केले आहे. २०२८-२९पर्यंत सीबीजीचे मिश्रण पाच टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादल्यामुळे देशभरातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. बी-हेवी मोलॅसिसच्या विक्रीचा प्रश्न गंभीर झाला आहे.

### 'सीबीजी' निर्मिती करा

» शरद पवार म्हणाले, की केंद्र सरकारने सात डिसेंबर २०२३ रोजी उसाचा रस आणि पाकापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर निर्बंध लादले आहेत. साखरेचा पाक आणि बी- हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करताना १७ लाख टन साखरेची मर्यादा घातली आहे. त्यामुळे आसवणी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू नाहीत. बहुतेक कारखान्यांकडे १५ डिसेंबर २०२३ पर्यंत बी-हेवी मोलॅसिसचा साठा पडून आहे, त्याची विक्री किंवा वापर कसा करायाचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादल्यामुळे देशभरातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत.

# प्रश्नपत्रिका फुटल्याचे आरोप पूर्णतः निराधार!

## उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाला स्थगिती : सावित्रीबाई फुले विद्यापीठ

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सारथी, बार्टी, महाज्योती यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी बुधवारी झालेल्या चाळणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाला स्थगिती देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाने जाहीर केला. मात्र, संपूर्ण परीक्षा प्रक्रिया सर्व परीक्षा केंद्रांवर अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली असून, प्रश्नपत्रिका फुटल्याचे आरोप पूर्णतः निराधार असल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले.**

पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी संयुक्त चाळणी परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे बुधवारी (१० जानेवारी) सकाळी दहा ते एक या वेळेत पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांतील परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. मात्र या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप परीक्षार्थ्यांकडून करण्यात आला. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या सेट विभागाचे समन्वयक प्रा. बी. बी. कापडणीस यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनास स्थगिती दिल्याचा निर्णय जाहीर केला. परीक्षेसाठी ए, बी, सी, डी अशा चार प्रश्नपत्रिका संचांची छपाई करण्यात आली होती. या प्रश्नपत्रिका संचांची छपाई दोन मुद्रणालयांकडून गोपनीयरित्या




करून घेण्यात आल्याने छपाई करण्याच्या स्वरुपामध्ये बदल असू शकतो. गोपनीय पद्धतीने आणि विहित सुरक्षा मानकांचे पालन करून छपाई केलेले संच परीक्षा केंद्रांवर सीलबंद स्वरुपात पोहचवण्यात आले. प्रश्नपत्रिका संच सी आणि डी मधील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचनेमधील सूचना क्र. ३ (३) मध्ये प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे, सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये, असे नमूद करण्यात आले होते. ए आणि बी प्रश्नपत्रिका संच सील होते, परंतु सी आणि डी प्रश्नपत्रिका संच वेगळ्या मुद्रणालयाकडून छपाई करुन घेतले असल्याने ते सील नव्हते. सील प्रश्नपत्रिका न मिळाल्यामुळे काही परीक्षार्थी हे परीक्षा देऊ शकले नाहीत. त्यांच्या बाबतीत परीक्षा प्रक्रिया पूर्ण झाली नाही. सी आणि डी संचामधील प्रत्येक प्रश्नपत्रिका संच सील नसले तरी प्रश्नपत्रिका संच असलेली पाकिटे सील होती. या पाकिटांचे सील केंद्रांवरच उघडण्यात आले. परीक्षा होण्यापूर्वी प्रश्नपत्रिकांची प्रत कोणत्याही व्यक्तिकडे कोणत्याही स्वरुपात (हार्ड कॉपी किंवा सॉफ्ट कॉपी) उपलब्ध नव्हती. तसेच त्या प्रश्नपत्रिकांमधील मजकूरदेखील कोणत्याही व्यक्तीला कळलेला नव्हता.संपूर्ण परीक्षा प्रक्रियादेखील सर्व परीक्षा केंद्रांवर पारदर्शकपणे पार पाडण्यात आली.

### आरोप हे पूर्णत: निराधार

» सारथी, बार्टी, महाज्योती यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी बुधवारी झालेल्या चाळणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाला स्थगिती देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाने जाहीर केला. मात्र, संपूर्ण परीक्षा प्रक्रिया सर्व परीक्षा केंद्रांवर अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली असून, प्रश्नपत्रिका फुटल्याचे आरोप पूर्णतः निराधार असल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले. प्रश्नपत्रिका फुटल्याबाबतचे आरोप हे पूर्णतः निराधार आहेत.

# क्लोरिन वायू गळती ‘मॉक ड्रिल’!

## प्रशासनाचा सराव : आपत्कालीन व्यवस्थापनासाठी सतर्कता







। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील औद्योगिक आस्थापनांनी सुरक्षेला प्राधान्य देऊन घातक रासायनिक पदार्थांची हाताळणी करताना किंवा वाहतूक करताना आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. महापालिकेच्या वतीनेही याबाबत विशेष काळजी घेतली जात असून भविष्यात अशा प्रकारची कोणतीही दुर्घटना घडल्यास तिच्यावर प्रभावीपणे नियंत्रण आणण्यासाठी शहरातील आपत्कालीन व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांशी समन्वय साधून शहरातील विविध औद्योगिक क्षेत्रांच्या ठिकाणी मॉक ड्रिलचे आयोजन केले जाईल जेणेकरून जिवीत आणि पर्यावरण हानी होण्यापासून बचाव केला जाऊ शकतो, असे प्रदीप जांभळे पाटील म्हणाले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज निगडी येथील सेक्टर २३ जलशुद्धीकरण केंद्र येथे क्लोरीन वायुगळती नियंत्रण या विषयावरील आपत्कालीन सरावाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील बोलत होते. या सरावावेळी महापालिका, एनडीआरएफ, पोलीस, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औद्यगिक सुरक्षा संचलनालय यांचा सहभाग होता. या मॉक ड्रीलवेळी महापालिकेचे सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रामध्ये क्लोरीनचा वापर जलशुद्धीकरणासाठी केला जातो. याकरिता याठिकाणी क्लोरीनचे सिलेंडर ठेवलेले असतात. कोणत्याही ठिकाणी रासायनिक विषारी वायुगळती झाल्यास ती दुर्घटना कशा पद्धतीने हाताळावी यासाठी महापालिकेच्या पुढाकाराने सेक्टर क्र.२३ येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात आपत्कालीन सराव घेण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीत हाताळणाऱ्या संलग्न यंत्रणांमध्ये समन्वय राहावा यासाठी हा सराव उपयुक्त ठरणार आहे, असे आपत्कालीन विभागाचे सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले.

### वायुगळतीबाबत जनजागृतीची गरज : अजयकुमार यादव

एनडीआरएफचे पोलीस निरीक्षक अजयकुमार यादव विषारी वायुगळती रोखण्याबद्दल माहिती सांगताना म्हणाले, क्लोरीन हा अतिशय घातक वायू आहे. हा हवेपेक्षा जड वायू असल्यामुळे शक्यतो तो जमिनीवरच पसरतो. नागरिकांनाही याबाबत अवगत करणे गरजेचे असून ज्या भागात क्लोरीनचा वापर केला जातो त्या भागातील नागरिकांमध्ये वायुगळतीबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. वायुगळती होऊ नये यासाठी जलशुद्धीकरण केंद्रांची वारंवार तपासणी करणे गरजेचे आहे. क्लोरीनचा वापर करणाऱ्या व्यक्तिला क्लोरीनच्या सर्व गुणधर्माबाबत माहिती असणे आवश्यक आहे. द्रव्य स्वरूपातील क्लोरीन हा आणखी घातक असून हवेच्या संपर्कात आल्यानंतर तो चार पटीने वाढतो. वायुगळती झाल्यास महापालिकेने शहरातील सर्व आपत्कालीन यंत्रणांसोबत समन्वय साधणे गरजेचे आहे. यासोबतच वायुगळतीबाबत नागरिकांमध्ये अफवाही पसरतात, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. अशा घटनांबाबत समाज माध्यमातूनही जनजागृती झाली पाहिजे. प्रत्यक्ष ठिकाणी आणि अप्रत्यक्ष ठिकाणी वायुगळतीबाबत वेगवेगळा कृती आराखडा तयार करणे गरजेचे आहे. तसेच साहित्य सुरक्षितता माहिती पत्रक बनविणे खूप गरजेचे आहे.

### ... अन् वायुगळती रोखली!

आपत्कालीन सरावाच्या सुरूवातीस महानगरपालिकेच्या निगडी येथील जलशुद्धीकरण प्रकल्पामध्ये सिलींडरमधून क्लोरीन वायुची गळती झाल्याची वर्दी जलशुद्धीकरण केंद्रातील अधिकाऱ्यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागास तसेच अग्निशमन विभागास दिली. वर्दी मिळताच तात्काळ अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाले. आपत्ती कक्षाकडून वैद्यकीय विभाग, पोलीस यंत्रणा, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औद्योगिक सुरक्षा संचलनालय, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला देखील संदेश देण्यात आला. त्यानंतर २ रुग्णवाहिका आणि पोलीस दल घटनास्थळी दाखल झाल्या. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी वायुगळती रोखण्यासाठी प्रयत्न सुरू केले. परंतु परिस्थिती आटोक्यात येत नसल्याचे पाहून एनडीआरएफ दलाला पाचारण करण्यात आले. एनडीआरएफ दलाच्या जवानांनी दाखल होताच बचावकार्याची प्रक्रिया सुरू केली. क्लोरीन वायुगळतीमुळे बाधित झालेल्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. हवेची दिशा पाहून वायुगळती रोखण्याचे कार्य एनडीआरएफने सुरु केले. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांनी अत्याधुनिक उपकरणे आणि साहित्यांच्या मदतीने यशस्वीरित्या वायुगळती रोखली. यामध्ये त्यांना महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनीही सहकार्य केले. या आपत्कालीन सरावामध्ये एनडीआरएफ दलाचे ५१ जवान, महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाचे २९ जवान, पोलीस दलाचे २२ जवान, दंगल नियंत्रण पथकाचे २० जवान, सुरक्षा विभागाचे ११ सुरक्षारक्षक तसेच वैद्यकीय विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते.

# विलास लांडेंना शिरुरची उमेदवारी द्या!

## अजित गव्हाणे यांची मागणी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष



। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिरुर लोकसभा मतदार संघातून माजी आमदार विलास लांडे यांना उमेदवारी द्यावी. पिंपरी-चिंचवडमधून आम्ही सर्वजण त्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करतो, अशी जाहीर मागणी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे. मोशी येथील पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा नुकताच झाला.**

मोशी येथील पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा नुकताच झाला. यावेळी महिला प्रदेशाध्यक्ष तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी आमदार विलास लांडे, महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी महापौर योगेश बहल, युवक शहराध्यक्ष शेखर काटे आदी उपस्थित होते. अजित गव्हाणे म्हणाले की, हवेली विधानसभा मतदार संघातून पक्षाचे आमदार म्हणून सुरूवातीला निवडून आलेले माजी आमदार विलास लांडे यांनी विविध विकासकामांसाठी पुढाकार घेतला आहे. भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडच्या विकासामध्ये त्यांनी योगदान दिले आहे. त्यांना शिरुर लोकसभा मतदार संघाची उमेदवारी दिल्यास पिंपरी-चिंचवडसह भोसरीतून मोठे मताधिक्य आम्ही देवू. त्यासाठी सर्वजण एकोप्याने कामाला लागतो. त्यामुळे लांडे यांच्या उमेदवारीसाठी योग्य ते प्रयत्न करावेत.

### अजित पवार यांच्या मनात चाललंय काय?

शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी जाहीरपणे विलास लांडे यांच्या उमेदवारीची मागणी केली. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणामध्ये त्याबाबत कोणताही उल्लेख केला नाही. “विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना मीच उमेदवारी दिली. पक्षात प्रवेश करुन घेतला. त्यांना निवडून आणण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली. खेड, मंचर, जुन्नर, हवेली चार तालुक्याची जबाबदारी दिलीप वळसे-पाटील यांना दिली. भोसरी, हडपसरची जबाबदारी आम्ही घेतली आणि डॉ. कोल्हे यांना निवडून आणले. दोन वर्षे होत नाहीत, तोच हा गडी राजीनामा देता म्हणाला. लोकांनी निवडून दिले, तर पाच वर्षे कामे तर केली पाहिजे.” अशी टीका नाव न घेता अजित पवार यांनी केली. मात्र, माजी आमदार विलास लांडे यांच्या उमेदवारीबाबत केलेल्या मागणीकडे त्यांनी कानाडोळा केल्याचे दिसून आले. दुसरीकडे, गेल्या काही दिवसांपासून शिरुर मतदार संघातून अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या उमेदवारीची चाचपणी सुरू असल्याचे बोलले जाते.

# एकपक्षीय राजवटीच्या दिशेने




**अपेक्षेप्रमाणे बांगलादेशात सत्ताधारी अवामी लीगचा सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड विजय झाला. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) आणि जमात-ए इस्लामी या दोन्ही मोठ्या पक्षांनी आणि काही लहान पक्षांनी निवडणुकीवर बहिष्कार घातला होता. अशा परिस्थितीत अवामी लीगचा प्रचंड विजय अपेक्षितच होता.**

अवामी लीगनंतर सर्वात मोठ्या संख्येने अपक्ष निवडून आले आहेत. अवामी लीगबरोबर युती असलेल्या जातीय पार्टीचा ११ मतदारसंघांत विजय झाला आहे. बांगलादेशची वाटचाल एकपक्षीय राजवटीच्या दिशेने होत आहे की काय अशी भीती काहीजण व्यक्त करत आहेत. पंतप्रधान शेख हसीना वाजेद आणि अवामी लीगचा निवडणुकीत सलग चौथ्यांदा विजय झाला आहे. गोपालगंज ३ येथून प्रचंड मताने निवडून आलेल्या शेख हसीना आता पाचव्यांदा पंतप्रधान होतील. सलग चौथ्यांदा आणि एकूण पाचव्यांदा पंतप्रधान होणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला आहेत.

बांगलादेशात एकूण ३०० मतदारसंघ आहेत. त्यापैकी २९९ मतदारसंघांत ७ जानेवारी रोजी मतदान झाले होते. त्यापैकी जवळपास २२३ मतदारसंघांत अवामी लीगचा विजय झाला आहे. २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत



जवळपास ८० टक्के मतदारांनी मतदान केले होते. त्यापूर्वी २०१४ च्या निवडणुकीत अंदाजे ३९ टक्के मतदान झाले होतं. बांगलादेश नॅशनल पार्टी आणि जमात-ए-इस्लामीने १९९६ मध्ये हंगामी आणि तटस्थ सरकारच्या नेतृत्वाखाली निवडणूक घेतली. त्यात अवामी लीगचा विजय झाला. एकूण मतदानातही वाढ झाली. तेव्हा जवळपास ७५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. या वेळेस चितागोंग येथे अधिक मतदान झाले, तर बीएनपीचा प्रभाव असलेल्या राजधानी ढाका, मैमनसिंग येथे कमी मतदान झाले. शेख हसीना यांना २,४९,९६५ मते मिळाली तर त्यांच्याविरुद्ध उभ्या असलेल्या मोहम्मद अलीपूर रेहमान यांना ६,९१४ मते मिळाली.

विरोधी पक्षांशिवायची ही निवडणूक 'शांततापूर्ण, मुक्त आणि न्याय्य' वातावरणात झाली असल्याचं मत निवडणुकीची पाहणी करण्यासाठी आलेल्या आंतरराष्ट्रीय निरीक्षकांच्या पथकाने व्यक्त केलं आहे. सरकारने अनेक देशातील निरीक्षकांना निवडणूक पाहण्यासाठी बोलावलं होतं. त्यात अमेरिका, कॅनडा, रशिया, ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉन्फरन्स (ओआयसी) इत्यादींचा समावेश होता. बांगलादेशातील काही लोकांचे म्हणणे आहे की ४० टक्के लोकांनी मतदानाचा हक्क बजावला त्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे कारण बहुतेक मतदान केंद्रांवर फारसे मतदार दिसत नव्हते. दुपारी ३ वाजेपर्यंत मात्र २७ टक्के मतदान झाले असल्याचे सांगण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त फोटोग्राफर आणि मानवाधिकार चळवळीतील कार्यकर्ते शाहिदऊल इस्लाम म्हणतात, 'आता डमी निवडणुकीत डमी उमेदवार डमी संसद चालवणार.' बीएनपी यांनी निवडणुका हंगामी, तटस्थ सरकारच्या नेतृत्वाखाली व्हाव्यात अशी मागणी केली होती आणि त्यासाठी २८ ऑक्टोबरपासून जमात-ए-इस्लामीबरोबर आंदोलन सुरू केले. १९९६ मध्ये शेख हसीना आणि अवामी लीगच्या मागणीमुळे घटनेत दुरुस्ती करून सार्वत्रिक निवडणुका 'हंगामी सरकार'च्या नेतृत्वाखाली घेण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार झालेल्या निवडणुकीत १९९६ मध्ये अवामी लीगचा विजय झाला आणि शेख हसीना पहिल्यांदा पंतप्रधान झाल्या. त्यानंतर २००१ मध्ये झालेल्या निवडणुकीत शेख हसीना यांचा पराभव झाला आणि बीएनपीच्या खालेदा झिया पंतप्रधान झाल्या. नंतर २००९ पासून शेख हसीना सलग विजयी होत आहेत. हंगामी तटस्थ सरकारच्या नेतृत्वाखाली निवडणुका घेणारी १३ वी घटना दुरुस्ती सर्वोच्च न्यायालयाने २०११ मध्ये घटनाविरोधी ठरवली होती. त्याच वर्षी शेख हसीना यांनी १५ वी घटना दुरुस्ती करून हंगामी आणि तटस्थ सरकारच्या नेतृत्वाखाली निवडणूक घेण्याची तरतूद रद्द केली.खालेदा झिया सध्या नजरकैदेत आहेत. त्यांचा मुलगा आणि पक्षाचा हंगामी प्रमुख तारिक रेहमान २००८ पासून लंडनला आहे. २००४ मध्ये शेख हसीना यांच्या सभेवर झालेल्या बॉम्बहल्ल्याच्या खटल्यात त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे.

## संपादकीय »

# फूल खिलेंगे!

***सर्जकतेच्या उत्कट बिंदूवरील व्यक्तीचे जाणे चटका लावणारे असते. राशिद खान यांचे निधन हे यात मोडते. भीमसेनजींस जाऊन एक तप लोटले. किशोरीबाई गेल्या त्यास सात वर्षे होतील.***

सर्जकतेच्या उत्कट बिंदूवरील व्यक्तीचे जाणे चटका लावणारे असते. राशिद खान यांचे निधन हे यात मोडते. भीमसेनजींस जाऊन एक तप लोटले. किशोरीबाई गेल्या त्यास सात वर्षे होतील. चार वर्षांपूर्वी जसराजजी गेले. मालिनीबाई राजुरकर अलीकडेच निवर्तल्या. आमच्या पिढीस गाण्यातील गंधर्वत्व आणि अलौकिक आध्यात्मिकता उमजण्याच्या आधीच कुमारजी आणि मल्लिकार्जुनअण्णा निघून गेले. या सगळ्यांचे जाणे निःसंशय वेदनादायी होते. उमटलेल्या ओरखड्याचा पोत या सगळ्यांपेक्षा वेगळा आहे. आपल्या डोळ्यासमोर, आपल्या बरोबरीने वा मागे-पुढे एखादे वर्ष असलेल्या एका तरुणाचे उस्तादात रूपांतर होताना पाहणे आणि त्या उस्तादाकडून आपल्या स्वरापेक्षांची पूर्तता होणार याची आनंदी खात्री असताना अचानक त्या व्यक्तीने जाणे याचे हे दुःख!

**शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी २०२२च्या हिवाळी अधिवेशनात शालेय शिक्षक भरतीची घोषणा केली. फेब्रुवारी २०२३ मध्ये दोन लाख ४० हजार उमेदवारांनी त्यासाठी अभियोग्यता चाचणीही दिली. त्याला आता ११ महिने लोटले आहेत, मात्र भरती अद्याप झालेली नाही.**

# शक्य असल्यास एक शिक्षक द्या!

२०२३ च्या हिवाळी अधिवेशनात दीपक केसरकर यांनी शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न सुटला असून दोन दिवसांत जाहिरात येईल, असे आश्वासन दिले. मात्र अद्यापही त्याची पूर्तता झालेली नाही. एकीकडे यात शिक्षकांचे करिअर पणाला लागले आहे, तर दुसरीकडे अपुऱ्या शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे आणि पर्यायाने भविष्याचेही अक्षम्य नुकसान होत आहे. सरकारला मात्र या साऱ्याशी काहीही देणे-घेणे नाही, मात्र त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था दयनीय झाली आहे. सरकारची शिक्षणविषयक बहुतेक धोरणे शाळांसाठी 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' ठरत आहेत. शिक्षणक्षेत्रात आपण एवढी 'प्रगती' केली आहे की, शिक्षकांअभावी शाळांना कुलूप लावावे लागत आहे. या अशा शाळा नाहीत, जिथे लाखांच्या पटीत फी भरण्याची पालकांची ऐपत असते. या शाळांमधील मुले मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कामगारांची असतात. कोरकू, पावरा, आदिवासी समाजाची



मुले जिल्हा परिषदेची शाळा बंद झाली तर काय करणार? त्यांच्यासाठी एक शाळा बंद झाली तर दुसऱ्या शाळेत प्रवेश घेण्याचा पर्याय उपलब्ध नसतो. त्यांच्यासाठी शाळा बंद म्हणजे शिक्षण बंद आणि भविष्य अंधारात, असे थेट समीकरण असते. शाळांची ही अवस्था आपल्याला राज्यातील सद्यस्थितीतील शिक्षण व्यवस्थेविषयी चिंतन करण्यास भाग पाडते. देशाचे पंतप्रधान 'परीक्षा पे चर्चा' या इव्हेंटच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात, मात्र खरे पाहता त्यांना त्या विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंतच पोहोचण्यात स्वारस्य आहे, असे दिसते. दुसरीकडे 'शिक्षक देता का शिक्षक' अशी विनंती करत गावचे सरपंच, लोकप्रतिनिधी बिचाऱ्या विद्यार्थ्यांना घेऊन कलेक्टर ऑफिसचे खेटे घालत राहतात. मुळात सरकारची ही 'परीक्षा पे चर्चा' सरकारी शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी आहे का, असा प्रश्न पडतो. आता पंतप्रधानांच्या पावलावर पाऊल टाकत राज्याचे मुख्यमंत्रीही शालेय विद्यार्थ्यांना पत्र लिहून त्यांच्याशी पत्राद्वारे संवाद साधू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याविषयी ते चर्चा करणार आहेत. पण त्यांना कोणी सांगेल का की तुम्ही थेट गरज जिथे आहे तिथे प्रत्यक्ष व्यावहारिक मदत का पोहचवत नाही? आज शंभर शंभर पोरांमागे एक शिक्षक अशी जिल्हापरिषद शाळांची अवस्था झाली आहे, काही ठिकाणी तर एकच शिक्षक प्रभारी शिक्षक म्हणून कामकाज सांभाळतात. अशावेळी आपण कुठून अपेक्षा करणार आहोत की त्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवावे, मराठीत तरबेज करावे, त्या मुलांना अंकगणिताच्या संकल्पनाही स्पष्ट कराव्यात?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हे गद्दार देशाचा पाकिस्तान करतायत!

## त्याला कळतं विषारी कोण आहे आणि कोण नाही : आदित्य ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हे गद्दार देशाचा पाकिस्तान करतायत, असं म्हणत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटावर थेट वार केला. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा, हे ब्रीदवाक्य मंत्रालयासमोर लावावं, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं.**



आमदार अपात्रतेच्या निर्णयावर बोलताना त्यांनी म्हटलं की, लोकशाही मारून टाकणारा हा निकाल आहे. चोरांना, गद्दारांना कायदेशीर मान्यता देणारा निकाल आहे. ही लढाई आता देशाच्या लोकसाहीची आहे. भाजपप्रणित खोके सरकारला संविधान मान्य नाही. 2024 मध्ये हे सरकार पुन्हा आल्यास भाजपाचे नवे संविधान ते देशावर लादतील, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी भाजपवर घणाघात केला.सर्वोच्च न्यायालयाने जे सांगितलं नव्हतं,त्यावर ते बोललेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात हा निकाल दिला आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला त्याला साजेसा हा निकाल आहे. त्यामुळे कदाचित हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान देखील आहे. आता फासावर लटकवले तरी चालेल पण लोकशाही आणि बाबासाहेबांचे संविधान आम्ही मारू देणार नाही, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. शिवाजी पार्क आर्ट फेस्टिवलच्या उद्घाटन कार्यक्रमाला आदित्य ठाकरेंनी हजेरी लावली. त्यावेळी ते बोलत होते. तेजस वाईल्ड लाईफ फिल्डमध्ये आहे. त्यामुळे त्याला कळतं कोण विषारी आहे आणि कोम विषारी नाही, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी तेजस ठाकरेंवर भाष्य केलं. ज्या अध्यक्षांनी कायदा आणि निकाल दिल्लीवरून लिहून घेतला आहे.राष्ट्रवादीबद्दलही असेच निकाल येणार आहेत, असं म्हणत राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर देखील आदित्य ठाकरेंनी निशाणा साधला. हे गद्दार देशाचा पाकिस्तान करतायत, असं म्हणत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे (Aaditya Thackeray) यांनी शिंदे गटावर (Shinde Group) थेट वार केला. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा, हे ब्रीदवाक्य मंत्रालयासमोर लावावं, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. आमदार अपात्रतेच्या निर्णयावर बोलताना त्यांनी म्हटलं की, लोकशाही मारून टाकणारा हा निकाल आहे. चोरांना, गद्दारांना कायदेशीर मान्यता देणारा निकाल आहे. ही लढाई आता देशाच्या लोकसाहीची आहे. भाजपप्रणित खोके सरकारला संविधान मान्य नाही. 2024 मध्ये हे सरकार पुन्हा आल्यास भाजपाचे नवे संविधान ते देशावर लादतील, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी भाजपवर घणाघात केला.

सर्वोच्च न्यायालयाने जे सांगितलं नव्हतं,त्यावर ते बोललेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात हा निकाल दिला आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला त्याला साजेसा हा निकाल आहे. त्यामुळे कदाचित हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान देखील आहे. आता फासावर लटकवले तरी चालेल पण लोकशाही आणि बाबासाहेबांचे संविधान आम्ही मारू देणार नाही, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. शिवाजी पार्क आर्ट फेस्टिवलच्या उद्घाटन कार्यक्रमाला आदित्य ठाकरेंनी हजेरी लावली. त्यावेळी ते बोलत होते. मूळ राजकीय पक्ष संदर्भात विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेला निर्णय निर्लज्जपणाचा कळस आहे, लोकशाहीच्या हत्या करणारा आहे.विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय देशासाठी मोठे संकेत आहेत. 2024 मध्ये अशा प्रकारची गद्दारी झाली तर, खोक्यांचा राजकारण झालं तर असंच त्यांना वाचवलं जाणार. भाजपाला आपलं संविधान बदलायचंय. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून दिलेले संविधान भाजपला मान्य नाही, भाजपला स्वतःच संविधान घ्यायचा आहे ते स्पष्ट झालं.

### हा निर्लज्जपणाचा कळस

» विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेला निर्णय निर्लज्जपणाचा कळस आहे, लोकशाहीच्या हत्या करणारा आहे.विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय देशासाठी मोठे संकेत आहेत. 2024 मध्ये अशा प्रकारची गद्दारी झाली तर, खोक्यांचा राजकारण झालं तर असंच त्यांना वाचवलं जाणार. भाजपाला आपलं संविधान बदलायचंय. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून दिलेले संविधान भाजपला मान्य नाही, भाजपला स्वतःच संविधान घ्यायचा आहे ते स्पष्ट झालं. नेक वर्षे राहुल नार्वेकर आमच्या पक्षात होते, तेव्हा ते कुठल्या पक्षप्रमुखाच्या तिकिटावर लढत होते ? असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित करत राहुल नार्वेकरांवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे आजारी असताना यांनी गद्दारी केली असल्याचं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. सर्वोच्च न्यायालयाने जे सांगितलं नव्हतं,त्यावर ते बोललेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात हा निकाल दिला आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला त्याला साजेसा हा निकाल आहे. त्यामुळे कदाचित हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान देखील आहे. आता फासावर लटकवले तरी चालेल पण लोकशाही आणि बाबासाहेबांचे संविधान आम्ही मारू देणार नाही, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं.

# टिका केली तर उरलेलं दुकान देखील बंद होईल

## मुनगंटीवारांची उद्धव बाळासाहेब ठाकरे गटावर बोचरी टीका

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तुम्हाला निर्णय मान्य नसेल तर, सुप्रीम कोर्टात तुम्ही रिव्ह्यू पिटिशन दाखल करू शकता. मात्र अशा पद्धतीने अपशब्द वापरणे, असभ्य, असंसदीय भाषेत वक्तव्य वारंवार करणे म्हणजे, बुडत्याचा पाय खोलात आहे. आधीच आपले 75 टक्के दुकान बंद झालं आहे. अशीच जर कृती करत राहिले तर, उरलेलं दुकान देखील बंद होईल.**

अशी बोचरी टीका सुधीर मुनगंटीवार (Sudhir Mungantiwar) यांनी ठाकरे गटावर (Thackeray Group ) केली आहे. मी गेल्या 30 वर्षांपासून आमदार आहे. माझ्या अनुभवातून मी सांगतो, हक्कभंगाची ही एकदम फिट केस आहे. मात्र हक्कभंग आणण्याच्या बाबतीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर (Rahul Narwkar) हे ठरवतील, असे देखील मुनगंटीवार म्हणाले. ते चंद्रपूर येथे बोलत होते. आमदार अपात्रता प्रकरणी आलेल्या निकालानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरेंनी असंसदीय भाषेत वक्तव्य केले, त्यांच्या विरोधात हक्कभंग आणण्यासाठी आमची प्रक्रिया सुरू झालीय, अशी माहिती शिवसेना



शिंदे गटाचे उत्पादन शुल्कमंत्री मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली आहे. यावर राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. शिवसेनेचा 7 -12 हा एकट्या उद्धव ठाकरेंचा कसा होऊ शकेल, कार्यकर्ते आणि ठाकरेंचा उर्वरित परिवार शिंदेंच्या सोबत आहे. त्यामुळे पक्ष तुमचा आहे. हे म्हणण्याचा अधिकार तुम्हाला कदापि नाही. आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल संपूर्ण न्यायालयीन प्रक्रिया पार पाडून देण्यात आलेला आहे. मात्र दिलेला निकाल जर तुम्हाला मान्य नसेल तर तुम्ही सुप्रीम कोर्टात रिव्ह्यू पिटिशन दाखल करू शकता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांविधानिक निर्णय दिला. तुम्ही त्यांच्या विरोधात असभ्य, असंसदीय भाषेत सतत टीका करता म्हणजे, बुडत्याचा पाय खोलात असल्याचेदेखील सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

### हक्कभंगाची एकदम फिट केस

» मी गेल्या 30 वर्षांपासून आमदार आहे. त्यामुळे माझ्या अनुभवातून मी हे सांगू शकतो, हक्कभंगाची ही एकदम फिट केस आहे. मात्र हक्कभंग आणायचा की नाही, हे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे ठरवतील. कारण मी ज्यावेळी स्वर्गीय आर आर आबांच्या विरोधात अपशब्द काढले होते, त्यावेळी मला देखील 90 दिवसांची शिक्षा झाली होती. त्यामुळे ही एकदम फिट केस आहे, असे मी ठामपणे सांगतो, असे त्यांनी यावेळी सांगितले. तुम्हाला निर्णय मान्य नसेल तर, सुप्रीम कोर्टात तुम्ही रिव्ह्यू पिटिशन दाखल करू शकता.

# मणिपूरची भारत जोडोला परवानगी!

## मर्यादित संख्येनेच भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी व्हावे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसची भारत जोडो न्याय यात्रा 14 जानेवारीला मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून सुरू होणार आहे. राज्य सरकारने बुधवारी सायंकाळी त्यास मंजुरी दिली. मात्र, राज्यातील कायदा व सुव्यवस्था पाहता मर्यादित संख्येनेच या यात्रेत सहभागी व्हावे, असे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात म्हटले आहे. यासोबतच यात्रेत सहभागी होणाऱ्या लोकांची संख्या आणि त्यांची नावे अगोदर दंडाधिकारी कार्यालयाला द्यावी लागणार आहेत.**

आदेशात पुढे म्हटले आहे की, इम्फाळ पूर्व जिल्ह्याच्या एसपींनी अहवाल सादर केला आहे की भारत जोडो न्याय यात्रेच्या उद्घाटन समारंभात मोठी गर्दी अपेक्षित आहे. राज्यातील सध्याची कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती पाहता, प्रचंड गर्दीमुळे समस्या निर्माण होऊ शकतात. याशिवाय इम्फाळ पूर्व जिल्ह्यातही कलम 144 लागू आहे.

आठ दिवसांपूर्वी काँग्रेसने इम्फाळमधील हप्त कांगजीबुंग मैदानातून यात्रेला झेंडा दाखविण्याची परवानगी मागितली होती. मात्र, यापूर्वी प्रशासनाने सुरक्षेचे कारण देत या प्रवासाला परवानगी दिली नव्हती. आज सकाळी दिल्लीत काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश आणि केसी वेणुगोपाल यांनी या यात्रेचा रोड मॅप आणि पॅम्प्लेट जारी केले. प्रदेश काँग्रेसचे प्रमुख केशम मेघचंद्र यांनी मुख्यमंत्री एन बिरेन यांची भेट घेतली आणि त्यांना इम्फाळमधील पॅलेस मैदानापासून यात्रा सुरू करण्याची परवानगी देण्याची विनंती केली. या यात्रेत आम्ही काँग्रेसचा झेंडा फडकवणार नाही, तसेच ही यात्रा राजकीय होणार नाही, असे मी मुख्यमंत्र्यांना सांगितले असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आता आम्ही हा प्रवास थौबल जिल्ह्यातील खाजगी मालमत्तेतून सुरू करण्याचा विचार करत आहोत असे ते म्हणाले होते. यापूर्वी, मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी मंगळवारी (9 जानेवारी) सांगितले होते की काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेला परवानगी देण्याचा



सक्रियपणे विचार केला जात आहे. सुरक्षा यंत्रणांचा अहवाल आल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल. तेव्हा वेणुगोपाल म्हणाले होते की, ही राजकीय यात्रा नाही, त्यामुळे सरकारने याचे राजकारण करू नये. संकटग्रस्त मणिपूरमधील लोकांच्या जखमा भरून काढणे आणि द्वेष संपवून प्रेमाचा संदेश देणे हा यात्रेचा उद्देश आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी 14 जानेवारीपासून भारत जोडो न्याय यात्रा सुरू करणार आहेत. ही यात्रा मणिपूरपासून सुरू होऊन 20 मार्चला मुंबईत संपेल. लोकसभा निवडणुकीच्या सुमारे 4 महिने आधी निघणाऱ्या या यात्रेत 14 राज्ये आणि 85 जिल्ह्यांचा समावेश असेल. या काळात राहुल पायी आणि बसने

6 हजार 200 किलोमीटरहून अधिक अंतर कापतील. काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल आणि जयराम रमेश यांनी 27 डिसेंबर रोजी पक्षाच्या मुख्यालयात भारत न्याय यात्रेची माहिती मीडियाला दिली होती. भारत जोडो यात्रेनंतर काँग्रेस भारत न्याय यात्रा काढणार असल्याचे पक्षाच्या नेत्यांनी सांगितले. ती मणिपूरपासून सुरू होऊन नागालँड, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि गुजरातमधून जाईल आणि महाराष्ट्रात संपेल. वेणुगोपाल यांनी सांगितले होते की, पक्षाचे अध्यक्ष खरगे या यात्रेला हिरवा झेंडा दाखवतील. आर्थिक,

### चर्च-गुरुद्वारालाही भेट दिली

» भारत जोडा यात्रेदरम्यान प्रसिद्ध व्यक्ती, लेखक, लष्करी दिग्गजांचाही सहभाग होता. यामध्ये माजी लष्करप्रमुख जनरल (निवृत्त) दीपक कपूर, माजी नौदल प्रमुख ॲडमिरल (निवृत्त) एल रामदास आणि आरबीआयचे माजी गव्हर्नर रघुराम राजन, माजी वित्त सचिव अरविंद मायाराम यांचा समावेश होता. या यात्रेत विरोधी पक्षनेतेही सहभागी झाले होते. नॅशनल कॉन्फरन्सचे फारुख अब्दुल्ला, ओमर अब्दुल्ला, पीडीपी प्रमुख मेहबुबा मुफ्ती, शिवसेनेचे बाळ ठाकरे, आदित्य ठाकरे, प्रियांका चतुर्वेदी, संजय राऊत आणि राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे यांसारखे विरोधी नेतेही पदयात्रेदरम्यान काही ठिकाणी राहुलसोबत फिरले.

सामाजिक आणि राजकीय न्याय हा भारत जोडो न्याय यात्रेचा उद्देश आहे. या यात्रेदरम्यान राहुल तरुण, महिला आणि उपेक्षित लोकांना भेटतील. बस प्रवासाच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल. प्रवासातील काही लहान भाग पायी देखील मधूनमधून कव्हर केले जातील. यापूर्वी राहुल गांधी यांनी 7 सप्टेंबर 2022 ते 30 जानेवारी 2023 या कालावधीत भारत जोडो यात्रा काढली होती. तामिळनाडूतील कन्याकुमारी येथून सुरू झालेला 145 दिवसांचा हा प्रवास जम्मू-काश्मीरमध्ये संपला. त्यानंतर राहुल यांनी 3570 किलोमीटरच्या प्रवासात 12 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेश कव्हर केले. श्रीनगरमध्ये यात्रेच्या समारोपाच्या वेळी शेर-ए-काश्मीर क्रिकेट स्टेडियमवर राहुल म्हणाले होते- मी ही यात्रा माझ्यासाठी किंवा काँग्रेससाठी नाही तर देशातील जनतेसाठी केली आहे. या देशाचा पाया उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या विचारसरणीच्या विरोधात उभे राहणे हे आमचे उद्दिष्ट आहे. यादरम्यान राहुल यांनी 12 सभांना संबोधित केले, 100 हून अधिक सभा आणि 13 पत्रकार परिषदा घेतल्या.

# पंजाब-यूपी-राजस्थानात थंडीचा इशारा

## संत्री उत्पादक शेतकऱ्याने केली होती आत्महत्या

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेश, छत्तीसगडसह उत्तर भारतातील राज्यांमध्ये थंडीचा प्रभाव कायम आहे. पंजाब, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये आज (गुरुवार, 11 जानेवारी) तीव्र थंडीचा इशारा जारी करण्यात आला आहे. माउंट अबूमध्ये तापमान 0 डिग्रीच्या खाली पोहोचले आहे. त्यामुळे तेथील रस्त्यांवर बर्फाचा थर दिसत होता.**

देशातील 10 राज्यांमध्ये दिवसाची सुरुवात दाट धुक्याने झाली. यामध्ये पंजाब, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, जम्मू-काश्मीर, हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, बिहार, आसाम आणि राजस्थान यांचा समावेश आहे. दाट धुक्यामुळे पंजाबमधील भटिंडा येथे दृश्यमानता शून्य होती. त्याच वेळी,



दिल्लीत दृश्यमानता 50 मीटर होती. त्यामुळे 24 गाड्या वेळेवर स्थानकावर पोहोचू शकल्या नाहीत. राजस्थानहून येणाऱ्या काही गाड्या 6 तास उशिराने धावल्या. दुसरीकडे, दक्षिणेकडील राज्यांमध्ये धुक्याचा इशारा देण्यात आलेला नाही. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज तामिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीपच्या काही भागात पाऊस पडू शकतो. IMD नुसार, शुक्रवारी उत्तर भारत आणि मध्य भारतातील 16 राज्यांमध्ये दाट धुके दिसू शकते. यामध्ये राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, आसाम, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, मध्य प्रदेश ओडिशा, बिहार, पश्चिम बंगाल आणि सिक्कीम यांचा समावेश आहे. स्कायमेटच्या म्हणण्यानुसार, पुढील 24 तासांत हरियाणा, पंजाब आणि उत्तर मध्य प्रदेशच्या काही भागात कडाक्याची थंडी पडू शकते. तसेच, पुढील 24 तासांत मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, लक्षद्वीप, तेलंगणा, कर्नाटक आणि छत्तीसगडच्या काही भागात हलका पाऊस पडू शकतो वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय झाल्यामुळे मध्य प्रदेश दाट धुक्याच्या गर्तेत आहे. काही जिल्ह्यांमध्ये हलका पाऊसही पडत आहे. गुरुवारी (11 जानेवारी) सकाळी अनेक जिल्ह्यांमध्ये दाट धुके आणि कडाक्याची थंडी होती. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, इंदूर, रतलाम, खंडवा, छिंदवाडा, सिवनी, बालाघाट, झाबुआ, धार, बैतूल, बुरहानपूरमध्ये आज हवामान बदलेल. हलका रिमझिम पाऊस पडू शकतो. हरियाणात कडाक्याची थंडी कायम आहे. या पार्श्वभूमीवर हवामान खात्याने आजही 9 जिल्ह्यांमध्ये थंडीचा पिवळा अलर्ट जारी केला आहे. यामध्ये पंचकुला, अंबाला, यमुनानगर, कुरुक्षेत्र, कैथल, सिरसा, फतेहाबाद, हिसार आणि कर्नाल जिल्ह्यांचा समावेश आहे. उर्वरित जिल्ह्यांसाठी कोणताही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही.

# राष्ट्राच्या अर्थावर प्रश्नचिन्ह उपस्थित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी वन नेशन-वन इलेक्शनवर असहमती व्यक्त केली आहे. ममता म्हणाल्या- घटनात्मक मुद्यावर त्या राष्ट्राच्या व्याख्येवर पूर्णपणे समाधानी नाहीत. यामध्ये दोन समस्या आहेत. प्रथम, त्यांना सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वावर एक राष्ट्र ही संकल्पना समजते. परंतु घटनात्मक मुद्द्यांवर त्याचा अर्थ कसा लावला जाईल? याबद्दल त्यांना शंका आहे. याशिवाय आपल्या देशातील प्रत्येक राज्याच्या विधानसभा निवडणुका आणि सार्वत्रिक निवडणुकांच्या चक्रात एवढा फरक असताना आपण ते कसे एकत्र आणणार. ममता पुढे म्हणाल्या की, ही संकल्पना कुठून आली हे कोडे जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत वन नेशनवर एकमत होणे कठीण आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील वन नेशन-वन इलेक्शन कमिटीला लिहिलेल्या पत्रात ममता यांनी या गोष्टी सांगितल्या आहेत.

पॅनेलला लिहिलेल्या पत्रात ममतांनी म्हटले आहे की, 1952 मध्ये केंद्र आणि राज्याच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. ही प्रथा काही वर्षे सुरू राहिली. नंतर ती साखळी तुटली. मला माफ करा, तुम्ही मांडलेल्या वन नेशन-वन इलेक्शनच्या संकल्पनेशी मी सहमत नाही. समितीच्या प्रस्तावाला सहमती देण्यात अनेक मूलभूत वैचारिक अडचणी असून त्याची संकल्पना स्पष्ट नसल्याचे त्यांनी सांगितले.

# DDLJ मध्ये शाहरुखने घातले होते 400 डॉलरचे जॅकेट

शाहरुख खान आणि काजोल स्टारर 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटाशी संबंधित एक किस्सा समोर आला आहे. या चित्रपटात शाहरुख लेदर जॅकेट घातलेला दिसत आहे. चित्रपट रिलीज झाल्यापासून ते जॅकेट खूप ट्रेंडमध्ये होते. शाहरुखला ते जॅकेट घालायचे आधीच ठरले नव्हते. ते जॅकेटही चित्रपटासाठी डिझाइन केलेले नव्हते. वास्तविक, ते जॅकेट चित्रपट निर्माता आदित्य चोप्राचा धाकटा भाऊ उदय चोप्राचे होते. उदय चोप्रा त्यावेळी त्याच्या मोठ्या भावाला दिग्दर्शनात मदत करत होता. विशेष म्हणजे शाहरुखने शूटिंगदरम्यान ते जॅकेट घातले होते कारण त्याला थंडी वाजत होती. आता त्याच्यावर हे जॅकेट



दिग्दर्शकाला इतकं आवडलं की या जॅकेटमध्ये 'जरा सा झूम लू मैं' या चित्रपटाचं प्रसिद्ध गाणं चित्रीत झालं. या गाण्यात शाहरुखने तेच जॅकेट घातलेला दिसत आहे. उदय चोप्राने हे जॅकेट कॅलिफोर्नियातील बेकर्सफील्ड येथील हार्ले डेव्हिडसन शोरूममधून $400 मध्ये विकत घेतले. भारतीय चलनानुसार 400 डॉलर म्हणजे 33000. हे एक शुद्ध लेदर जॅकेट होते जे आजही ट्रेंडमध्ये आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील हा पहिला चित्रपट होता ज्याने स्वतःच्या मेकिंगचीही निर्मितीही केली होती. तांत्रिकदृष्ट्या तेव्हापासून ते 'बिहाइंड द सीन' म्हणून ओळखले जाते. आदित्य चोप्राचा धाकटा भाऊ उदय चोप्रा हा चित्रपटात त्याचा सहाय्यक होता, ज्याला मेकिंग रेकॉर्डिंगची जबाबदारी मिळाली.

## हृतिकच्या वाढदिवशी 'फायटर'

फिटनेस आणि सिक्स पॅक ॲब्ससह बॉडीसाठी ओळखला जाणारा अभिनेता हृतिक रोशनचा पुढचा चित्रपट म्हणजे 'फायटर'. यामध्ये तो स्क्वाड्रन लीडर समशेर पठानिया (पॅटी) ची भूमिका साकारत आहे. बुधवारी, अभिनेत्याच्या 50 व्या वाढदिवसानिमित्त, त्याच्या आगामी चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्याला वेगळ्या पद्धतीने शुभेच्छा दिल्या. निर्मात्यांनी चित्रपटाचा एक बीटीएस (पडद्यामागील) व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये हृतिकच्या अनेक छटा दिसत आहेत. हे शेअर करताना निर्मात्यांनी लिहिले - हृतिक स्क्रीनला रोशन करतो.51 सेकंदाच्या या व्हिडिओमध्ये हृतिकचा डान्स, लुक्स आणि ट्रेनिंगबद्दल बोलले जात आहे. हा ट्रान्सफॉर्मेशन व्हिडिओ शेअर करताना निर्मात्यांनी सांगितले की, चित्रपटात पॅटीच्या भूमिकेत येण्यासाठी हृतिकला खूप मेहनत करावी लागली. 'फायटर' चित्रपटात हृतिक खतरनाक एरियल ॲक्शन करताना दिसणार आहे. यामध्ये दीपिका पदुकोण पहिल्यांदाच त्याच्या सोबत दिसणार आहे. या चित्रपटात अनिल कपूरचीही महत्त्वाची भूमिका आहे. 25 जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. 'फायटर'च्या निर्मात्यांव्यतिरिक्त, आई पिंकी रोशन आणि वडील राकेश रोशन यांनीही हृतिकला त्याच्या 50 व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हृतिकच्या बालपणीचा एक न पाहिलेला फोटो शेअर करताना आईने एक भावनिक नोट लिहिली आहे. बॉडीसाठी ओळखला जाणारा अभिनेता हृतिक रोशनचा पुढचा चित्रपट म्हणजे 'फायटर'.



## वडिलांचा हात धरून स्टेजवर आली आयरा

बुधवारी संध्याकाळी आमिर खानची मुलगी आयरा आणि फिटनेस एक्सपर्ट नुपूर शिखरे यांचा उदयपूरच्या हॉटेल ताज अरावली पॅलेसमध्ये विवाह झाला. हॉटेलच्या मयूरबागेत दुपारी 4 वाजता सुरू झालेल्या लग्नसोहळ्यासाठी आमिर खान आणि त्याची आई झीनत हुसैन वधू आयराला मंचावर घेऊन आले. यानंतर आयरा आणि नुपूर शिखरे यांनी एकमेकांचा हात धरला आणि एकत्र राहण्याचे वचन दिले. दोघांनीही एकमेकांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी पांढऱ्या रंगाच्या थीमने मंडप सजवण्यात आला होता. लग्नानंतर, एक कौटुंबिक फोटोशूट झाले ज्यामध्ये आमिर खानच्या दोन्ही माजी पत्नी रीना दत्ता, किरण राव, पुतण्या इम्रान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. फोटोशूटनंतर रात्रीचे जेवण झाले ज्यात पाहुण्यांना महाराष्ट्रीयन, राजस्थानी आणि गुजराती जेवण देण्यात आले. कढी-तांदूळ, राजस्थानी डाळ-बाती-चुरमा आणि डाळ-ढोकळा यांचाही मेनूमध्ये विशेष समावेश होता. तत्पूर्वी, मंगळवारी रात्री एका संगीत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये आमिरने हृतिक रोशनच्या 'कोई मिल गया' या चित्रपटातील 'इट्स मॅजिक...' या गाण्यावर खास परफॉर्मन्स दिला होता. आमिरने दुसरी माजी पत्नी किरण राव आणि मुलगा आझादसोबत स्टेजवर 'एक हजारों में मेरी बहना है..' हे गाणे गायले. या कार्यक्रमात परफॉर्म करण्यासाठी आमिर गेल्या काही दिवसांपासून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेत होता. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या संगीत सेरेमनीमध्ये आयरा आणि नुपूरच्या कुटुंबातील सदस्यांनी आपापल्या परफॉर्मन्स दिला. पाहुण्यांनी पंजाबी आणि बॉलीवूड गाण्यांवर जोरदार नृत्य केले. फंक्शनमध्ये आयरा एम्ब्रॉयडरी लेहेंग्यात तर नुपूर पँट-सूटमध्ये दिसला. या जोडप्याचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यांनी सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ शेअर केले आहेत.

## ऐश्वर्याच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन गेल्या अनेक दिवसांपासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. दरम्यान, ऐश्वर्या राय आता अभिषेक बच्चनच्या कबड्डी संघाला चिअर करताना दिसली. ऐश्वर्याचा व्हिडिओ समोर येताच तिच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम लागला आहे. अलीकडेच, स्टार स्पोर्ट्स इंडियाने प्रो कबड्डी लीगचा एक व्हिडिओ जारी केला आहे, ज्यामध्ये ऐश्वर्या राय, अभिषेक बच्चन, आराध्या बच्चन आणि अमिताभ कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरला सपोर्ट करताना दिसत आहेत. संपूर्ण बच्चन कुटुंब टीमला सपोर्ट करताना खूप आनंदी दिसत असल्याचं व्हिडिओमध्ये पाहायला मिळत आहे. संघ जिंकल्यावर संपूर्ण कुटुंब आनंदाने जल्लोषात होते. अभिषेक बच्चन कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरचा मालक आहे. प्रो कबड्डी लीगच्या 10 व्या हंगामात जयपूर पिंक पँथरचा सामना 7 जानेवारी रोजी यू मुंबाशी झाला. जयपूर संघाने मुंबई संघाचा 41-31 असा पराभव करत विजय मिळवला. संपूर्ण बच्चन कुटुंब प्रो कबड्डी लीगचा सामना पाहण्यासाठी त्याच जर्सी घालून आले होते. समोर आराध्या बसली होती, तर ऐश्वर्या अमिताभ बच्चनसोबत बसली होती. अभिषेक बच्चननेही त्याच्या टीम जयपूर पिंक पँथरची मॅच कुटुंबासोबत बसून पाहिली.



# भारताचा शानदार विजय

## भारत अफगाणिस्तान टी 20 मालिकेला सुरुवात

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना मोहालीत खेळला गेला. या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा ६ गडी राखून पराभव केला. तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली. या सामन्यात अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना पाच गडी गमावून १५८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने शिवम दुबेच्या अर्धशतकाच्या जोरावर १७.३ षटकांत चार गडी गमावून लक्ष्य गाठले.**

अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-20 मालिकेतील पहिला सामना भारताने 6 गडी राखून जिंकला आहे. यासह टीम इंडियाने अफगाणिस्तानविरुद्ध आपला अपराजित विक्रम कायम ठेवला आहे. टी-20 मधील भारताचा अफगाणिस्तानवरचा हा पाचवा विजय आहे. या विजयासह भारतीय संघाने 3 सामन्यांच्या मालिकेत 1-0 ने आघाडी घेतली आहे. या मालिकेतील दुसरा सामना 14 जानेवारीला इंदूरमध्ये होणार आहे. मोहालीत गुरुवारी टीम इंडियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 5 गडी गमावून 158 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने 17.3 षटकांत 4 गडी राखून लक्ष्य गाठले. शिवम दुबेने नाबाद 60 धावा केल्या, तर जितेश शर्माने 31 धावांची खेळी केली. सलामीवीर शुभमन गिलने 23 आणि टिळक वर्माने 26 धावांचे योगदान दिले. गोलंदाजीत मुकेश कुमार आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. भारतासाठी शिवम दुबेने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ४० चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ६० धावांची खेळी साकारली. याशिवाय जितेश शर्मानेही ३१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्याचबरोबर मुजीबने अफगाणिस्तानकडून सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. १५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात खूपच खराब झाली. डावाच्या पहिल्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर कर्णधार रोहित शर्मा खाते न उघडता धावबाद झाला. सलामीचा जोडीदार



गिलसोबत योग्य ताळमेळ राखता न आल्याने रोहित शर्मा धावबाद झाला. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी शुबमन गिलने तिलक वर्मासोबत २८ धावांची भागीदारी केली. पण गिललाही क्रीजवर जास्त वेळ घालवता आला नाही आणि चौथ्या षटकात तो मुजीब उर रहमानचा बळी ठरला. त्यानंतर तिसऱ्या विकेटसाठी तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनी ४४ धावांची (२९ चेंडू) भागीदारी केली, जी ९व्या षटकात तिलक बाद झाल्यानंतर संपुष्टात आली. तिलक वर्माने २२ चेंडूंत २ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने २६ धावा केल्या. त्याबरोबर अफगाणिस्तानकडून मुजीब उर रहमानने दोन आणि अजमतुल्ला उमरझाईने एक विकेट घेतली. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत ५ गडी गमावून १५८ धावा केल्या. यादरम्यान नबीने २७ चेंडूंचा सामना करत ४२ धावा केल्या. त्याने ३ षटकार आणि २ चौकार मारले. अजमतुल्लाने २२ चेंडूंचा सामना करत २९ धावा केल्या. यादरम्यान अक्षर पटेलने भारताकडून अप्रतिम गोलंदाजी करत २ विकेट्स घेतल्या. त्याने ४ षटकात २३ धावा दिल्या. मुकेश कुमारने ४ षटकात ३३ धावा देत २ विकेट्स घेतल्या. शिवम दुबेलाही एक यश मिळाले. आता या मालिकेत दुसरा सामना १४ जानेवारीला इंदूरमध्ये खेळवला जाईल. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना मोहालीत खेळला गेला. या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा ६ गडी राखून पराभव केला. दरम्यान या सामन्यातील रोहित शर्मा आणि शुबमन गिलचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. ज्यामध्ये कर्णधार रोहित शर्मा धावबाद झाल्यानंतर शुबमन गिलवर संतापताना दिसत आहे. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माचे १४ महिन्यांनंतर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन निराशाजनक राहिले. पहिल्या डावात क्षेत्ररक्षण करताना त्याने शानदार नेतृत्त्व केले. पण जेव्हा तो त्याच्या एकदिवसीय जोडीदारासह सलामीला आला, तेव्हा तो दुर्दैवी ठरला. रोहित शर्मा दुसऱ्या चेंडूवर शून्यावर बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. रोहितने शॉट खेळल्यानंतर धाव घेण्यासाठी नॉन स्ट्राइकिंग एंडवर असलेल्या शुबमन गिलला हाक दिली, पण शुबमनने ना त्याच्याकडे पाहिले ना त्याची हाक ऐकली. त्यामुळे दोघेही एकाच टोकाला उभे राहिले आणि रोहित शर्मा धावबाद झाला. शून्य धावसंख्येवर भारताने पहिली विकेट गमावली.

### रोहित शर्मा ठरला दुर्दैवी

» रोहित शर्मा आता १० नोव्हेंबर २०२२ नंतर पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला. पण तो दुर्दैवी होता आणि विशेष काही करू शकला नाही. रोहित धावबाद झाल्यानंतर गिलही काही विशेष करू शकला नाही आणि चौथ्या षटकात २३ धावांवर यष्टिचित झाला. कर्णधार आणि खेळाडू म्हणून रोहित शर्मासाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी टीम इंडियाची ही शेवटची टी-२० मालिका आहे. या मालिकेनुसार आगामी विश्वचषकात रोहित कोणती भूमिका बजावणार हेही ठरवले जाऊ शकते. आता १४ जानेवारीला होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात सर्वांच्या नजरा हिटमॅनच्या बॅटवर असतील. भारताने पहिल्या टी-२० सामन्यात अफगाणिस्तानचा सहा विकेट्सनी पराभव केला आहे. अफगाणिस्तानने या सामन्यात नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावून १५८ धावा केल्या होत्या.


# आमचा वेग खरोखरच कमी झाला आहे !

## पाकिस्तानचा कर्णधार शाहीन आफ्रिदीने केले सूचक विधान

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तान क्रिकेट संघ नेहमीच आपल्या वेगवान गोलंदाजांमुळे चर्चेत असतो. मात्र नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांच्या घटत्या वेगावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, शाहीन आफ्रिदीने या प्रश्नांची उत्तरे देताना सांगितले की, “मी स्वत: आणि इतर गोलंदाजांचा वेग कमी झाल्याने आश्चर्यचकित झालो आहे.**

शाहीन आफ्रिदीने न्यूझीलंडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, “खरे सांगायचे तर, आम्ही स्वत: ओ मीटरचा वेग पाहत होतो आणि ते पाहून आश्चर्यचकित झालो. आमचा वेग खरोखरच कमी झाला आहे का? कारण खूप प्रयत्न करूनही वेग वाढत नव्हता हे आम्हाला समजत नव्हते. १३०-१३२ प्रती/किमी पाहणे निराशाजनक आहे. आम्ही १३० प्रती/किमीपेक्षा जास्त जाणार नाही, हे आधीच ठरवले होते का याबद्दल आम्हाला आश्चर्य वाटले.” पाकिस्तानच्या कर्णधाराने त्या स्पीडो मीटरला दोष दिला आहे. शाहीन आफ्रिदी पुढे म्हणाला, “या घसरणीला अनेक



घटक कारणीभूत ठरू शकतात. गोलंदाज दुखापती टाळण्यासाठी वर्कलोडचे व्यवस्थापन करत आहेत. त्या प्रक्रियेत काही जण वेगवान गोलंदाजी करत नाहीत. तसेच, सतत जर १३० किमी/प्रती तास दाखवत असतील तर, त्यात काही दोष असू शकतो. पाकिस्तानचे वेगवान गोलंदाज त्यांच्या गोलंदाजीवर अधिक काम करत आहेत.” पाकिस्तानची वेगवान गोलंदाजी फार पूर्वीपासून अभिमानाची आणि गर्वाची गोष्ट आहे. इम्रान खान आणि वसीम अक्रमपासून ते शाहीन शाह आफ्रिदी आणि हारिस रौफ यांच्या सध्याच्या पिढीपर्यंत, वेगवान गोलंदाजी हा पाकिस्तानी क्रिकेटचा अविभाज्य भाग आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेने दर्जेदार गोलंदाजांची उणीव उघडकीस आली असून पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांच्या कमतरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. गेल्या वर्षभरापासून पाकिस्तानची कामगिरी फारशी प्रभावशाली नाही. आशिया चषकानंतर एकदिवसीय विश्वचषक आणि त्यानंतर कसोटी मालिका गमावल्यामुळेही संघाला टीकेला सामोरे जावे लागले आहे. मात्र, दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने तिन्ही फॉरमॅटच्या संघात बरेच बदल केले आहेत.

### संघ ऑकलंडला पोहोचला

» शाहीन आफ्रिदीच्या नेतृत्वाखाली संघ आगामी दौऱ्यासाठी ऑकलंडला पोहोचला आहे. पाकिस्तानने नुकताच ऑस्ट्रेलिया दौरा पूर्ण केला आहे. या काळात संघाला कसोटी मालिकेत ३-० ने पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्याच वेळी, आता टी-२० संघाचे सदस्य सिडनीहून थेट न्यूझीलंडला पोहोचले आहेत.